# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ११ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.२८ नोव्हेंबर, २०१५ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची ११ वी बैठक दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | श्री. मते एच. बी., संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ४) | प्रा. सूर्यवंशी एस. एस., प्र. ग्रंथपाल | सदस्य |
| ५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

स्वागत:

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले व खालीलप्रमाणे माहिती दिली.

महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरण व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पूरत्या पुढे ढकलणे) अधिनियम २०१५" पारीत केला असून त्याद्वारे सर्व अधिकारमंडळाच्या निवडणूका दि.३१/०८/२०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२५/०८/२०१५ च्या पत्रानुसार इतर बाबीबरोबरच "दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणामध्ये केवळ पदसिध्द सदस्य कार्यरत रहातील" असे कळविले आहे.

वरील परिस्थितीत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम २५ नुसार अधिसभेचे ८ सदस्य (पदसिध्द सदस्य) राहतील.

या ८ सदस्यांचा विचार करता महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ४९ (३) नुसार १/३ गणपूर्तीकरिता ३ सदस्यांची आवश्यकता आहे. ३ सदस्य उपस्थित असल्याने गणपूर्ती होत असल्याने अधिसभेची बैठक मा. अध्यक्षांच्या परवानगीने सुरु करण्यात आली.

**अनुपस्थिती :**

मा. संचालक (उच्च शिक्षण), पुणे मा.प्र. सहसंचालक (तंत्र शिक्षण) आणि मा. संचालक (डी. एम. ई. आर.) हे अधिसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना दहाव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

"अ" जनरल आणि कुलसचिव कार्यालय:

१. प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलाकडील रिक्त असलेली शिक्षकांची पदे भरण्याकरीता दिनांक ०२.०४.२०१५ रोजी दैनिक सकाळ, एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज, महाराष्ट्र शासनाच्या व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

२. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सर्व विद्याशाखांतर्गत सुधारित करण्यात आलेले अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेले असून तसे सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

३. प्रस्तुत विद्यापीठामधील विद्याविहार परिसरात सुरक्षा भिंत बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकांम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३१,००,०००/- (रुपये एकतीस लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

४. प्रस्तुत विद्यापीठामधील विद्याविहार परिसरात ज्ञानतीर्थनगर येथील सुरक्षा भिंत बांधणे भाग एक करिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६०,००,०००/- (रुपये साठ लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

५. प्रस्तुत विद्यापीठामधील विद्याविहार परिसरात ज्ञानतीर्थनगर येथील सुरक्षा भिंत बांधणे भाग दोन करिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९,००,०००/- (रुपये नऊ लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

६. विद्यापीठ परिसराच्या सायन्स सेंटरच्या बाजूस सुरक्षा भिंत बांधणे भाग एक करिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६०,००,०००/- (रुपये साठ लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

७. विद्यापीठ परिसराच्या सायन्स सेंटरच्या बाजूस सुरक्षा भिंत बांधणे भाग दोन करिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३२,००,०००/- (रुपये बत्तीस लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

८. विद्यापीठाने नव्याने संपदित केलेल्या ४८२ एकर परिसरात आरोग्यकेंद्र इमारतीचे बांधकाम करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३२,००,०००/- (रुपये बत्तीस लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

९. विद्यापीठाने नव्याने संपादित केलेल्या ४८२ एकर परिसरात फॅकल्टिक्लब/जिम्नॅशिअम करिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. २ सोलापूर यांचेकडे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९१,००,०००/- (रुपये एक्यानऊ लाख फक्त) इतकी अंशदान ठेव म्हणून वर्ग करण्यात आलेली आहे.

१०. प्रस्तुत विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाकडे एकूण रु. ७,५४,९९२/- इतक्या रक्कमेचे जिमन्याशिअम साहित्य खरेदी करुन बसविण्यात आले आहे. त्याचा लाभ वसतिगृहातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना होत आहे.

११. भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने उच्च शिक्षण संदर्भात ऑल इंडिया स्टेट युनिव्हर्सिटीच्या कुलगुरुंची राऊंडटेबल बैठक दि. १४ व १५ मार्च, २०१५ रोजी लखनऊ विद्यापीठ, लाखनऊ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु उपस्थित होते.

१२. डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु यांनी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय यांनी मुंबई विद्यापीठ, कलिना परिसर येथे दि. १०.०४.२०१५ रोजी आयोजित “Choice Based Credit System and Credit Framework for Skill Based Vocational Courses the Basic Template” सहा राज्यातील (महाराष्ट्र, गोवा, मध्यप्रदेश, झारखंड, छत्तिसगड व बिहार) कुलगुरुकरीता आयोजित कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

१३. दिनांक ०१ मे, २०१५ रोजी महाराष्ट्र दिना निमित्त विद्यापीठामध्ये मा. कुलगुरुंच्या शुभहस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला त्यावेळी विद्यापीठात शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी-विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

१४. राष्ट्रीय उच्चस्तर अभियान (RUSA) अंतर्गत सुधारीत प्रस्ताव दिनांक १२ मे, २०१५ रोजी शासनास सादर करण्यात आला.

१५. प्रस्तुत विद्यापीठाने वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक ११ मे, २०१५ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेली होती. त्यामधून श्री. नारकर सतिश अनंत, उपकुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांची वित्त व लेखा अधिकारी या पदावर नेमणूक करण्यात आली. त्यांनी वित्त व लेखा अधिकारी या पदाची सुत्रे दि. २६.०५.२०१५ रोजी हाती घेतली.

१६. प्रस्तुत विद्यापीठ परिसरात उर्दू, पाली, प्राकृत आणि संस्कृत या प्राचीन भाषांचे अधिविभाग सुरु करण्यास परवानगी मिळणे बाबत तसे प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करण्यात आले आहेत.

१७. अहवाल कालावधीत कॅस अंतर्गत डॉ. ए. बी. नारायणपेठकर, डॉ. पी. प्रभाकर आणि डॉ. एस. एस. सुर्यवंशी यांना प्राध्यापक म्हणून दिलेल्या पदोन्नतीस शासनाकडून परवानगी मिळाली.

१८. दिनांक ६ व ८ मे, २०१५ रोजी सामाजिकशास्त्रे, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, कला व ललित कला या विद्याशाखांतर्गत अध्यापन होत असलेल्या पदवी व पदव्युत्तर वर्गातील विषय तसेच इलेक्टिव विषय समकक्ष विषय ठरविण्या बाबत विद्यापठ कार्यालयात सर्व अधिष्ठाता व स्थायी/अस्थायी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांच्या बैठका संपन्न झाल्या.

१९. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेशित एकूण ४२५ मगासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व फ्रीशीपचे ऑन लाईन अर्ज मा. आयुक्त जिल समाज कार्यालय, सोलापूर यांना सादर करण्यात आलेले होते. त्यापैकी एकूण २८१ विद्यार्थ्यांची फी रु. २५,१०,२७०/- विद्यापीठास प्राप्त झाली असून ती संबधित विद्यार्थ्यांच्या फी पोटी जमा करण्यात आली.

२०. विद्यापीठातील विविध संकूल/अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी प्रवेश समिती गठन करण्यात आली असून समितीद्वारे प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेशाची जाहिरात तयार करण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाईन प्रवेशपूर्व परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याचे काम सुरु आहे. प्रवेश पूर्व परीक्षा हया दिनांक ३ ते ५ जून, २०१५ या दरम्यान सोलापूर, पंढरपूर, बार्शी, कोल्हापूर आणि सातारा येथिल केंद्रावर घेण्यात आल्या.

२१. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालय, विषय/अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावपैकी पात्र प्रस्तावावर विहित कार्यवाही करुन ते पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आले.

२२. विद्यापीठातील योजनातंर्गत योजनेमधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे वेतन अनुदाने योजनेत्तर योजना या लेखा शिर्षकामधून होण्याकरीता दिनांक २९.०४.२०१५ च्या पत्रान्वये संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.

२३. दिनांक १५ मे, २०१५ रोजी राजभवन कार्यालय, मुंबई येथे आयोजित केलेल्या जे.बी.व्ही.सी. आढावा बैठकीकरीता प्रस्तुत विद्यापठामधून श्री. एस. के. माळी, कुलसचिव आणि श्री. बी. पी. पाटील, परीक्षा नियंत्रक हे बैठकीसाठी उपस्थित होते.

२४. प्रस्तुत विद्यापीठातील रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर वर्ग १ व २ या पदांची जाहिरात विविध वर्तमानपत्र, विद्यापीठ संकेतस्थळ, तसेच महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीलच्या अनुषंगाने आवेदनपत्र मागविण्याची अंतिम तारीख १९.०६.२०१५ पर्यंत होती.

२५. प्रस्तुत विद्यापीठातील रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर वर्ग ३ व ४ या पदांची जाहिरात विविध वर्तमानपत्र, विद्यापीठ संकेतस्थळ तसेच महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने आवेदनपत्र मागविण्याची अंतिम तारीख २०.०६.२०१५ पर्यंत होती.

२६. प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील हे संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ या पदावर दि. २६ मे, २०१५ रोजी रुजु झाले.

२७. प्राध्यापक श्री. हनुमंत मते हे संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, सोलापूर विद्यापीठ या पदावर दि. ०२ जून, २०१५ रोजी रुजु झाले.

२८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) पध्दतीची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक २५ मे, २०१५ रोजी प्रस्तुत विद्यापीठात कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेस डॉ. आर. डी. कपले व डॉ. वाय. एम. जयराज हे साधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. तसेच अनेक संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व संकुलाचे संचालक तसेच स्थायी व अस्थायी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष उपस्थित होते.

२९. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सर्व विद्याशाखांतर्गत सुधारीत करण्यात आलेले अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आपलोड करण्यात आले असून सर्व संलग्नित महाविद्यालयांना सुधारीत अभ्यासक्रमाबाबत पत्रा ई-मेलद्वारे व टपालाने पाठविण्यात आले आहेत.

३०. राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद नियमावली २०१४ या अधिसूचनेनुसार बी.एड, बी.पी.एड आणि एम.एड हे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून एक वर्षा ऐवजी दोन वर्षाचे करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर कोर्सचे अभ्यासक्रम तयार करुन घेण्यासाठी उपसमितीची बैठक दिनांक ०४.०६.२०१५ रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाली.

३१. प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुल/अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी ऑनलाईनद्वारे प्रवेश पूर्व परीक्षेचे अर्ज स्विकारण्याचे काम पूर्ण झाले असून त्यामुळे एम.ए. व एम.एस्सी. करीता एकूण २४७८ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. प्रवेश पूर्व परीक्षा दिनांक ०३.०६.२०१५ ते दिनांक ०५.०६.२०१५ या दरम्यान सोलापूर, पंढरपूर, बार्शी, कोल्हापूर व सातारा या केंद्रावर घेण्यात आली. सदर परीक्षेसाठी एम.एस्सी., एम.सी.ए. व एम. कॉम या अभ्यासक्रमासाठी एकूण २२५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश पूर्व परीक्षा दिली.

३२. अहवाल कालावधीतील सन २०१५-१६ मध्ये संलग्नित महाविद्यालयातील बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी. (ई.सी.एस.) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्यासाठी ऑनलाईनद्वारे अर्ज घेण्याचे काम सुरु आहे. आज अखेर एकूण १२५० विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले असून प्रवेश पूर्व परीक्षा दिनांक १९.०६.२०१५ रोजी आयोजित करण्यात आली.

३३. प्रस्तुत विद्यापीठातील कार्यरत संवैधानिक अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर अशा एकूण १६४ कर्मचाऱ्यांचा वैद्यकीय प्रतिपूर्ती विमाछत्र उतरविण्याची कार्यवाही पूर्ण झाली.

३४. प्रस्तुत विद्यापीठातील सर्व इमारतींचा व त्यामधील मालमत्तेचा विमा M/s TATA AIG Genral Insurance Company यांचेकडे उतरविण्यात आला.

३५. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या दिनांक २७.०७.२०१५ रोजी आकस्मित झालेल्या निधनामुळे प्रस्तुत विद्यापीठामध्ये दिनांक २८.०७.२०१५ रोजी शोकसभेचे आयोजन करयात आले होते. सदर शोकसभेस मा. कुलगुरु, विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी दिवगंत राष्ट्रपतींना श्रध्दांजली वाहिली.

३६. प्रस्तुत विद्यापीठाचा ११ वा वर्धापन दिन भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या निधनामुळे आणि राष्ट्रीय दु:खवट्यामुळे दिनांक ०५ ऑगस्ट, २०१५ रोजी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमात या वर्षापासून प्रथमच डॉ. अच्युत गोडबोले जेष्ठ शास्त्रज्ञ व लेखक यांना जीवन गौरव पुरस्कार बहाल करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार, उत्कृष्ट महाविद्यालय प्राचार्य पुरस्कार, उत्कृष्ट शहरी आणि ग्रामिण महाविद्यालय पुरस्कार, नियतकालीका पुरस्कार आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच या समारंभात पदार्थविज्ञान संकुलातील वरीष्ठ प्राध्यापक डॉ. ला. प. देशमुख यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. तर भूशास्त्र विभागातील प्रयोगशाळा सहाय्यक श्री. डी. टी. गुजर यांना गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्काराने गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि जेष्ठ मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

३७. कला, विज्ञान आणि वाणिज्य या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्ज स्विकारण्याच्या तारखा निश्चित करुन या बाबतचे परिपत्रक विद्यापठाच्या संकेतस्थळाावर प्रसिध्द करण्यात आले.

३८. अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता विद्यापीठातील विविध संकुले, अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश पूर्व परीक्षेस एकूण २२५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक १२.०६.२०१५ रोजी जाहिर करण्यात आला असून मेरीटनुसार दिनांक १८.०६.२०१५ ते दिनांक ०४.०७.२०१५ या दरम्यान प्रथम व द्वितीय फेरी नुसार संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले.

३९. अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये M. Sc., M. A., M. C. A. इत्यादी विषयासाठी एकूण ८८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

४०. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून बी. ए. भाग-१ व एम. ए. भाग-२ या पाठ्यक्रमाचा निवड आधारित श्रेयांक प्रणाली नुसार सुधारीत अभ्यासक्रम तयार करुन घेण्यासाठी अभ्यासमंडळाच्या बैठका संपन्न झाल्या.

४१. दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त श्री. भिष्मा मुठेकर (Algorhythms Consultant Pvt. Ltd., Pune) या तज्ञांचे How to use web O-PAC या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यान शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

४२. १५ ऑगस्ट, २०१५ रोजी स्वातंत्र दिनांनिमित्त सकाळी ठीक ८.०० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरु महोदयांच्या शुभहस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास सर्व अध्यापक, प्रशासकीय सेवक व संकुलातील विद्यार्थी व विद्यार्थीनीं आपला सहभाग नोंदविला.

४३. दि. २८/०८/२०१५ रोजी मुंबई विद्यापीठ दिक्षांत समारंभ कक्ष येथे “Globalization of Higher Education: Way forward” या विषयावर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित गोलमेज परिषदमध्ये डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी सहभाग नोंदविला व आपले विचार मांडले. सदर परिषदेस कुलपती व राज्यपाल, मा. श्री. सी. विद्यासागरराव, मा. श्री. ना. विनोदजी तावडे, कॅबिनेट मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. श्री. ना. रविंद्र वाईकर, राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. श्री. संजय चहांदे आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर व डॉ. जे. बी. जोशी यांनी मार्गदर्शन केले.

४४. सोलापूर विद्यापीठाने “राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान” (RUSA) अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावावर “Project Approval Board” ने दि. ०५/०९/२०१५ रोजी सोलापूर विद्यापीठास Infrastructure Grant रु. २० कोटीचे अनुदान शिफारस केले आहे.

४५. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये विद्यापीठातील विविध संकुले आणि अधिविभागाकडे एकूण ८८७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या आहे. या पैकी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीकरीता अर्ज ऑनलाईन भरण्याची कार्यवाही पूर्ण झाली.

४६. कला व ललित कला, अभियांत्रिकी, वाणिज्य, विधी, समाजिकशास्त्रे, विज्ञान व शिक्षणशास्त्र या विद्याशाखांच्या विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या बैठका आयोजित करण्यात आल्या.

४७. दिनांक ०२ ऑक्टोंबर, २०१५ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमास प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्वांनी स्वच्छता अभियान कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला.

४८. दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१५ भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून सदर दिवस "वाचन व प्रेरणा दिवस" म्हणून साजरा करण्यातबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी परिपत्रकाद्वारे कळविल्याप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठात दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१५ हा दिवस "वाचन व प्रेरणा दिवस" म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने डॉ. कल्पना अंधारे, प्लास्ट इंडिया फाऊंडेशन सदस्या यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि शिक्षक व कर्मचारी वृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

४९. सोलापूर विद्यापीठ व बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना, औरंगाबाद (लातूर) यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित "कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला २०१५" सालाबादप्रमाणे याही वर्षी चौथ्या व्याख्यानमाले अंतर्गत दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१५ रोजी श्री. संजीव चांदोरकर, प्राध्यापक टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई यांचे "जागतिक वित्तीय संकट आणि भारतीय अर्थव्यवस्था" या विषयावर व्याख्यान विद्यापीठ सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानमालेस विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि कर्मचारीवृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

५०. अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये विद्यापीठातील विविध संकुलाकडील प्रवेशित एकूण ८९० विद्यार्थ्यापैकी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे काम सुरु आहेत. तसेच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचे एकूण ३८ विद्यार्थ्यांचे अर्ज तपासनू प्रस्ताव मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयास सादर करण्यात आलेले आहेत. तसेच अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना/सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय ई.बी.सी. इत्यादी शिष्यवृत्तीचे अर्ज छाननी करुन प्रस्ताव सादर करण्यात आले.

५१. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सर्वेक्षणाच्या अखिल भारतीय उच्चस्तर शिक्षा सर्वेक्षण सन २०१४-१५ व (एआयएसएचई) मधील सतेच माहिती व्यवस्थापकीय प्रणालील (MIS) यप २०१४-१५ ची माहिती नोंदणी करण्याच्या संदभ्‍ारत कार्यशाळा आयोजनाबाबत आदेशित केले होते. त्यानुसार विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयातील नोडल अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांची दिनांक ०८.१०.२०१५ राजी विद्यपीठ सभागृहामध्ये कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेत उच्च शिक्षण संचालनालयातील श्री. ए. ए. बनगे संशोधन सहाय्यक अधिकारी साधन व्यक्ती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

"ब" महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ:

१. अहवाल कालावधीत शिक्षक मान्यता विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या एकूण ०६ अर्जावर कार्यवाही करुन संबंधितांना माहिती पाठविण्यात आली आहे.

२. संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३ स्थाननिश्चिती शिबीर शहरी व ग्रामीण १ व २ विभागानुसार दिनांक ०७.०४.२०१५ ते दिनांक १०.०४.२०१५ पर्यंत संपन्न झाले.

३. शासनाने दिलेल्या आदेशानुसार अपंग विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा पुरविण्या बाबतच्या सूचना संलग्नित महाविद्यालयांना देण्यात आल्या असून त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

४. शासन आदेशानुसार खजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीबाबत सूचना संलग्नित व्यावसायिक अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.

५. कला व ललित कला विद्याशाखांतर्गत पी.एच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित एकूण ०५ विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेऊन पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

६. प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नित विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक ही रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या पाच प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीस मान्यता देण्यात आली आहे.

७. विद्यापरिषदेने संलग्निकरणाच्या नुतनीकरणास व नैसर्गिक विस्तारास मान्यता दिलेल्या माहविद्यालयांना मान्यता पत्र निर्गमित करण्यात आले.

८. शिक्षक मान्यता विभागाकडे माहिती अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या ०८ अर्जांवर कार्यवाही करुन संबंधितांना माहिती देण्यात आली आहे. दोन अपिल अर्जांवर कार्यवाही करण्यात आली.

९. नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमानात वाढ करणेसंदर्भात विविध महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या दोन अध्यापक आणि एक प्राचार्य यांच्या प्रस्तावर आढावा समितीची बैठक घेऊन त्या बाबतचा शिफारस अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

१०. अहवाल कालावधीमध्ये पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेशति कला व ललित कला विद्याशाखा व विज्ञान तसेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेमधील चार विद्यार्थ्यांची आणि समाजिकशास्त्रे विद्याशाखेमधील तीन विद्यार्थ्यांची असे एकूण सात विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेऊन पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

११. SUS-PET ६-२०१५ पीएच. डी. प्रवेश परीक्षा दिनांक २६ जुलै, २०१५ रोजी घेण्यात आली. यावर्षी प्रथमच विधी, फार्मसी व अभियांत्रिकी या विद्याशाखांची पीएच. डी. प्रवेयश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने संगणकशास्त्र संकुलात घेण्यात आली आणि त्याचा निकाल दिनांक ०६.०८.२०१५ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला.

१२. २१ संलग्नित महाविद्यालयाकडून प्रप्त झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्राचे एकूण ६३ प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडील पुढील कार्यवहिसाठी पाठविण्यात आले.

१३. अहवाल कालावधीत डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर आणि सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग या महाविद्यालयातील प्रत्येकी एक प्रमाणे एकूण दोन शिक्षकांना गुणवत्तेवर आधारीत सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली.

१४. SUS-PET-6-2015 पीएच. डी. प्रवेश परीक्षेची साधारण गुववत्ता यांदी दिनांक ०६ ऑगस्ट, २०१५ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

१५. ११ महाविद्यालयातील एकूण ६४ शिक्षकांनी लघुसंशोधन प्रकल्प ऑन लाईन पध्दतीने विद्यापीठ अनुदान कार्यालय, पुणे येथे पाठविण्यात आले.

१६. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग या महाविद्यालयास पीएच.डी. इतिहास या अभ्यासक्रमाच्या संशोधन सुविधा केंद्राच्या प्रथम संलग्निकरणास पाच वर्षाकरीता मान्यता देण्यात आली.

१७. संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर या महाविद्यालयातील सात शिक्षकांना व दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील दोन शिक्षकांना गुणवत्तेवर आधरित सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली.

१८. शासनाने दिलेल्या आदेशानुसार केंद्र पुरस्कृत सिपडा योजनेतंर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करणेबाबत योग्य तो प्रस्ताव शासनास पाठविणेकामी शासनाने दिलेलया आदेशानुसार सुचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना देण्यात आली आहे.

१९. नॅक मुल्यांकन समिती, बेंगलोर प्रस्तुत विद्यापीठास दि. ०९ सप्टेंबर, २०१५ ते दि. १२ सप्टेंबर, २०१५ रोजी भेट देणार असल्यामुळे अहवाल कालावधीत विद्यापीठातील इमारतींची रंगरंगोटी करण्यात आली असून संपूर्ण परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले या मध्ये विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले. नॅक मुल्यांकन समितीने वरील कालावधीत विद्यापीठातील सर्व संकुलास व प्रशासकीय विभागांस तसेच ग्रंथालयास भेट दिली यावेळी संबंधित विभागाकडून सदर समितीपूढे सादरीकरण करण्यात आले. याचे श्रेय म्हणून दि. १६.११.२०१५ रोजी प्रस्तुत विद्यापीठास नॅक समिती कडून "ब" दर्जा प्राप्त झाला असून त्या आशयाचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

"क" परीक्षा विभाग:

१. मे, २०१५ मध्ये होणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र) परीक्षांचे वेळापत्रक अंतिम करण्यात आले असून या परीक्षांच्या सर्व प्रश्नपत्रिका ऑन लाईन पध्दतीने पाठविण्यात आल्या.

२. राजेश अग्रवाल समितीच्या श्यिफारशींच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सोलापूर विद्यापीठ परीक्षा विभागाकडून Social Networking Site च्या माध्यमातून Whatapp वर ग्रुप तयार करुन ऑनलाईन प्रश्नपत्रिकेच्या कार्यप्रणालीसाठी आवश्यक त्या सूचना व संपर्क ठेवण्यासाठी या माध्यमाचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे सर्व घटकांशी संपर्क ठेवणे सोईचे व विना खर्चाचे होत आहे.

३. मे, २०१५ मध्ये होत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र) परीक्षांचे वेळापत्रक अंतिम करण्यात आले असून या सर्व परीक्षांच्या प्रश्नपत्रिका Online Question Paper Deliver (DPDES) पध्दतीने पाठविण्याची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. या पैकी शिक्षणशास्त्र शाखेच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडलेल्या आहेत.

४. मार्च/एप्रिल, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या कला विद्याशाखेंतर्गत बी.ए. भाग -३ सत्र ५ व ६ या परीक्षांचे निकाल अवघ्या १५ दिवसात जाहिर करण्यात आला. या अभ्यासक्रमाचा निकाल विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध केलेला आहे. जवळपास आठ हजार विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले होते. या परीक्षेचा शेवटचा पेपर दि. १६.०४.२०१५ झाला होता. त्या नुसार १५ व्या दिवशी म्हणजेच दि. ३०.०४.२०१५ रोजी जाहिर करण्यात आला. सोलापूर विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच १५ व्या दिवशी निकाल जाहिर करण्याची अलौकिक कामगिरी विद्यापीठाने केली आहे. विद्यापीठ परिसरामधील एम.ए. या परीक्षांचे निकाल १७ दिवसात जाहिर करण्यात आले. तसेच बी.एस्सी. भाग-३ व बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी भाग- ३ परीक्षांचे निकाल २२ दिवसात जाहिर करण्यात आले.

५. एप्रिल/मे, २०१५ मध्ये झालेल्या सर्व ५१२ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. पैकी ४६३ परीक्षांचे ९०.४३ टक्के निकाल ३० दिवसात व ४९ परीक्षांचे निकाल ९.५७ टक्के निकाल ४५ दिवसात जाहीर करण्यात आले. या सत्रातील एकही निकाल ४५ दिवसांच्या पुढे गेला नाही. जाहीर निकालापैकी काही अभ्यासक्रमाचे निकाल तर १, ५, ६, व ७ दिवसात प्रसिध्द करण्यात आले आहेत ही या सत्राची विशेष दखलपात्र बाब आहे.

६. जुलै, २०१५ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील परीक्षा नियंत्रक व त्यांचे सहकारी शिष्ठमंडळाने विद्यापीठ परीक्षा विभाग व मध्यवर्ती मुल्यामापन केंद्र येथे भेट देऊन सुरु असलेल्या गतिमान कामकाज प्रक्रियेचे कौतुक केले.

७. अभियांत्रिकी विद्याशाखेच्या द्वितीय वर्षाच्या मेकॅनिकल या शाखेतील Theory of Machine (TOM-१) या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत १०० गुणापैकी ४० गुणांचे प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे असल्याने विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रारी व विविध संघटनांच्या निवदेनांचा विचार करता परीक्षा मंडळाच्या तातडीच्या बैठकीचे आयोजन करण्यात येऊन त्यामध्ये सदर विषयाची फेर परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर परीक्षा दिनांक ०९.०८.२०१५ रोजी संबंधित परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडली.

८. विद्यापीठाच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०५.०८.२०१५ रोजी आयोजित केलेल्या समारंभात प्रसिध्द संगणक तज्ञ व लेखक व श्री. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते विद्यापीठाच्या On Line Transcripts and Online Verification of Documents या Link चे उद्घाटन करण्यात आले. त्यानुसार विद्यार्थ्यांना ई-पेमेंट केल्यानंतर व पोर्टलच्या माध्यमातून विद्यापीठात न येता परदेशातून Transcripts & Verification of Document करुन घेण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

९. सन २०१५-१६ करीता बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी प्रवेश व परीक्षा अर्ज भरुन घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

१०. परीक्षा मंडळाची नियोजित वेळापत्रकानुसार बैठक दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी संपन्न झाली.

११. विद्यार्थ्यांच्या सोईसाठी परीक्षा विभागाकडे विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरु करण्यात आले.

१२. राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीकरीता राजभवन कार्यालयाचे सुचनेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल विद्यापीठाचे, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. रमेश काटे यांनी परीक्षा विभागास भेट दिली व आढावा घेतला.

"ड" वित्त व लेखाविभाग:

१. विद्यापीठाचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल म्हणून मे. टॅप ॲन्ड असोसिएट, सोलापूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केलेले आहे.

२. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील चारमाही अंदाजपत्रक तयार करुन ते मा. संचालक उच्च शिक्षण पुणे यांचे कार्यालयास सादर केला.

"ई" ग्रंथालय, संकुले व चर्चासत्रे:

१. ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारात RFID Card Biometric मशिन असणारा दरवाजा बसविण्यात आला आहे.

२. पदार्थ विज्ञान संकुलातील विद्यार्थ्यांकरीता दिनांक ०२ ते ०५ मार्च, २०१५ तर सामाजिकशास्त्रे संकुलातील ॲप्लाईड इकॉनॉमिक्स या विभागाच्यावतीने दिनांक ०९ ते १२ मार्च, २०१५ या कालावधीत शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले.

३. दिनांक ३ व ४ मे, २०१५ रोजी संगणकशास्त्र संकुलात दोन दिवशीय राज्यस्तरीय “Application Development for Mobile using Android” या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस एकूण ६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

४. रसायनशास्त्र संकुलाकडे कमवा व शिका या योजनेत निवड झालेल्या संकुलातील विद्यार्थ्यांकडून संकुलाच्या आतील व बाहेरील परिसरातील स्वच्छता व झाडांची निगा राखण्यात येत आहे.

५. दिनांक ३१.०७.२०१५ रोजी गुरुपोर्णिमेचे औचित्य साधून भूशास्त्र संकुलातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संकुलात वृक्षारोपन केले.

६. सामाजिकशास्त्रे संकुलामधील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभागाने डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे यांच्या सामंजस्य करार (MoU) केला. या करीता समाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. ई. एन. अशोककुमार, डॉ. निंबाळकर व श्री. प्रभाकर कोळेकर यांनी दिनांक २३.०७.२०१५ रोजी डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे येथे भेट दिली. सामंजस्य करार (MoU) नुसार पुरातन अवशेष डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे यांचेकडून सामाजिकशास्त्रे संकुलामधील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्वशास्त्रे विभागास देणगी स्वरुपात देण्यात आले.

७. सामाजिकशास्त्रे संकुलातील अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सी. एस. भानुमते यांनी मा. कुलगुरु महोदयांच्या मार्गदर्शनानुसार सोलापूर विद्यापीठाच्या वतीने दिनांक ०३.०७.२०१५ रोजी कोल्हापूरातील Chh. Shahu Institute of Business Education and Research (C.S.I.B.E.R.) या स्वायत्त संस्थे सोबत आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यासोबत दिनांक ०७.०७.२०१५ रोजी सामंजस्य करार (MoU) केला आहे.

८. संगणकशास्त्र संकुलातील एम.सी.ए. व एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमाचे दिनांक २३ जुलै, २०१५ ते दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहली दरम्यान म्हैसूर येथील म्हैसूर विद्यापीठ व येथील अन्य आय. टी. कंपनीस विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भेट दिली.

९. दि. २६/०८/२०१५ व दि. २७/०८/२०१५ रोजी संगणकशास्त्र संकुलामध्ये MCA व M. Sc. (Computer Science) च्या विद्यार्थ्यांसाठी Cogzy Technologies Pvt. Ltd., Bengaluru व Syneoteck Software Solutions, Pune या कंपन्यामार्फत Campus Interview चे अयोजन करण्यात आले होते. या कंपनीद्वारे Online Interview घेण्यात आले. सदर Campus Interview मध्ये एकूण नऊ विद्यार्थ्यांची Trainee Software Develper या पदावर निवड झाली आहे.

१०. प्रा. एस. एच. बेहरे, पदार्थ विज्ञान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे भूशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांना दिनांक १७.१०.२०१५ रोजी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

११. सामाजिकशास्त्रे संकुलातील रुरल डेव्हलपमेंट विभागातर्फे दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१५ रोजी "आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिन" निमित्त प्रस्तुत विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या एकूण सात खेडगावातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा त्यांनी केलेल्या योगदानाबाबत सत्कार करण्यात आला. सदर सत्कार समारंभ कार्यक्रमास मा. श्रीमती पल्लवी रेणके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार यांनी भुषविले.

१२. दिनांक २९.०९.२०१५ रोजी संगणकशास्त्र विभागाकडे Quick Heal Technologies या कंपनीतर्फे एम.सी.ए. आणि एम.एस्सी. च्या विद्यार्थ्यांकरीता Cyber Crime या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यानात एकूण १०७ विद्याथ्यांनी आपला सहभाग नोंदविला. कंपनीतर्फे सहभागी विद्यार्थ्यांना Quick Heal Antivirus C. D. भेट देण्यात आली.

१३. वाणिज्य व्यवस्थापन संकुलामार्फत श्री मारुती करंडे यांच्या "धम्माल एक लग्नाची" या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी विद्यापीठ सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थीनी व कर्मचारीवृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

**"फ" राष्ट्रीय सेवा योजना:**

१. राजभवन आयोजित आव्हान २०१५ राज्स्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर कार्यक्रम एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथे दिनांक २५ मे, २०१५ ते दिनांक ०३ जून, २०१५ या कालावधीत संपन्न झाला. या शिबीरामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे १८ स्वयंसेवक व ०६ स्वयंसेविका आणि ०१ संघनायक असा एकूण २५ जणांचा संघ सहभागी झाला.

२. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये नि:स्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या नि:स्वार्थ सेवेचा यथेचित गौरव करण्याचा दृष्टीने सोलापूर विद्यापीठांतर्गत महाविद्यालय/कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना खाली नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला.

   १. उत्कृष्ठ महाविद्यायीन पुरस्कार (कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर- स्मृतिचिन्ह)
   २. उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारी पुरस्कार (प्रा. डॉ. सौ. फेमिदा शब्बीर बिजापूरे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, सोलापूर स्मृतिचिन्ह व रु. ५,०००/-)
   ३. उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार (कु. कानडे प्रतिक्षा उमाकांत, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, स्मृतिचिन्ह व रु. २,०००/-)

वरील प्रमाणे पुरस्कार दिनांक ०८ जून, २०१५ रोजी शाहीर अमरशेख सभागृह, विद्यार्थी भवन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

३. किर्लोस्कर वसुंधरा क्लब आणि सृजन फिल्म सोसायटी यांच्याविद्यमाने किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे आयोजन दिनांक २३ ते २६ जुलै, २०१५ या कालावधीत करण्यात आले. निसर्गसंवर्धन या उद्देशाला अनुसरुन ०७ व्या महोत्सवाचा विषय **"शून्य कचरा- (सुरुवात आपल्यापासून)"** असा होता. या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता विद्यापीठ सभागृहामध्ये संपन्न झाला. या उद्घाटनकार्यक्रमास तसेच महोत्सवामध्ये राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या सोलापूर शहरातील महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

४. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक ०९ ते ११ सप्टेंबर, २०१५ या कालावधीमध्ये पूर्व राष्ट्रस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीर संपन्न झाले. या शिबीरातध्ये सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेतील ०५ स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

५. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये नि:स्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करण्याऱ्यांना त्यांच्या अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या सेवेचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने शासनाने खालीलप्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे.

   १) राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रशंशा प्रमाणपत्र पुरस्कार- प्रा. संतोष राजगुरु, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर.
   २) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार (स्मृतिचिन्ह व रु. २,०००/-)
   श्री. तारिक लतीफ तांबोळी, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

६. दिनांक १५.१०.२०१५ रोजी सोलापूर विद्यापीठ व प्लास्ट इंडिया फाऊंडेशन यांचे विद्यमाने आयोजित डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम भारताचे माजी राष्ट्रपती यांच्या जन्मदिनानिमित्त स्वच्छ सोलापूर अभियान रॅली संपन्न झाली. या रॅलीमध्ये सोलापूर शहरातील राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या एकूण १० महाविद्यालयामधून एकूण ६५० स्वयंसेवक/स्वयंसेविका आणि १२ कार्यक्रम अधिकारी/विभागीय समन्वयक सहभागी झाले.

७. सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयामध्ये दिनांक ०२.१०.२०१५ हा दिवस महात्मा गांधी जयंती निमित्त आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

८. सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेलया महाविद्यालयामध्ये दिनांक २४.०९.२०१५ ते दिनांक ०२.१०.२०१५ या कालावधीमधील राष्ट्रीय सेवा योजना कार्यप्रसिध्दी सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्वच्छ भारत अभियान/श्रमदान वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

"ग" क्रीडा व विद्यार्थी कल्याण विभाग:

१. दिनांक ०५.१०.२०१५ रोजी आय. आय. एस. विद्यापीठ, जयपूर येथे लॉन टेनिस मुलींच्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये सोलापूर विद्यापीठाने कास्य पदकाची कमाई केली व आखिल भारतीय आंतर विद्यपीठ स्पर्धेसाठी पात्र झाला.

२. सोलापूर विद्यापीठाचा १२ वा युवा महोत्सव दिनांक ०९ ते १२ ऑक्टोंबर, २०१५ दरम्यान एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव सोलापूर येथे आयोजित करण्यात आला. यामध्ये विविध २७ कला प्रकाराच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सदर युवा महोत्सवात एकूण ५३ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता. यामध्ये सर्वाधिक गुण मिळालेल्या वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास सर्व साधारण विजेत्या पदाचा फिरता चषक देण्यात आला तर दुसरे सर्वसाधारण विजेतेपद संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांना आणि तिसरे सर्वसाधारण विजेतेपद छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर यांना प्रदान करण्यात आले.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि.२९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या दहाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/६५५, दि.२३/०४/२०१५ अन्वये, दि.२९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या दहाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२१/०५/२०१५ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या दहाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.२९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या दहाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

**[ २ ] सन २०१४-१५ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

> "ही अधिसभा वित्त व लेखा समितीने शिफारस केल्याप्रमाणे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता समितीच्या शिफारशी मान्य करुन व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारात घेता असा ठराव करते की, सन २०१४-१५ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०१४-१५ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल लेखापरिक्षक M/s. TAP & Associates, Solapur यांनी अंतिम करुन सादर केल्यानंतर समान लेखा संहिता (Common Account Code) तरतूद क्र.1.50(g),(h) नुसार लेखापरिक्षणातील आक्षेप वगळण्याबाबतची शिफारस मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालील उपसमिती गठीत केली.

१) श्री. बी. आर. गायकवाड
२) डॉ. ए. ए. शेख

या समितीने दि.०७/०८/२०१५ रोजी बैठक आयोजित करुन लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपावर सविस्तर चर्चा केली व सादर केलेल्य कागदपत्रावर आक्षेप वगळण्याबाबतचा अहवाल सादर केला दि.१४/०८/२०१५ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र.३(२) अन्वये लेखापरीक्षक यांनी सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल, विभागाचा पूर्तता अहवाल व आक्षेप पूर्तता करण्याकरिता नेमलेल्या वित्त व लेखा समितीच्या उपसमितीने केलेला शिफारस अहवाल विचारार्थ सादर करण्यात आला. त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव क्र.३(२) "विद्यापीठाचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (e) नुसार अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेस शिफारस करण्यात आली."

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.२५/०८/२०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

ठराव क्र.१० महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८(सीसी) नुसार सन २०१४-१५ चे लेखापरिक्षीत लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेस मान्यतेकरीता केलेली शिफारस सर्वानुमते स्विकारुन तशी अधिसभेस शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०१४-१५ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या आक्षेप वगळण्याच्या शिफारशी अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव: प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर श्री. एच. बी. मते यांनी अनुमोदन दिले.**
**सन २०१४-१५ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालातील कार्यालयाने केलेली पूर्तता यावर चर्चा झाली व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ३ ] सोलापूर विद्यापीठाच्या सन २०१३-१४ चा तयार केलेला १० व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे प्रस्ताव केला आहे.

"ही अधिसभा वार्षिक अहवाल समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या १० व्या वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा १० वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २) | डॉ. श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| ३) | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५) | डॉ. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६) | श्रीमती ए. एस. साळुंखे | सदस्य - सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषेच्या दि.०४/११/२०१५ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेचा विषय क्र.९(४) नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा १० वा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा तयार केलेला १० व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **सदरचा प्रस्ताव प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. एच. बी. मते यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ४ ] **शै.वर्ष २०१६-१७ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता विद्या परिषदेने मान्य केलेला शै. वर्ष २०१६-१७ या एका वर्षाच्या बृहत आराखड्याची महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यास अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये दिलेली मान्यतेची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: बृहत आराखड्याबाबत म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) तरतूद :- The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unserved and under - developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

त्या अनुषंगाने महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.१५/०४/२०१५ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.०४ अन्वये शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखड्यास अनुसरुन शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) नुसार शै.वर्ष २०१६-१७ या एका वर्षाचा बृहत आराखडा तयार करून व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेला होता. सदर बृहत आराखडा दि.२६/०५/२०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता ठराव क्र. ०४ अन्वये व्यवस्थापन परिषदेने विद्या परिषदेस शिफारस केलेला होता. तद्‌नंतर दि.१३/०८/२०१५ च्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.४९ नुसार व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेला बृहत आराखडा खालीलप्रमाणे दुरुस्तीसह मान्य केलेला आहे.

## सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

### शै. वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय सुरु करु इच्छिणाऱ्या संस्थांसाठी शैक्षणिक बृहत आराखडा

सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत सस्थांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कायम विना अनुदानित तत्वावर खालील प्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्या समोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत (बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्सी. (ई.सी.एस.), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी. एस. डब्ल्यू व एम. एस. डब्ल्यू), इंजिनिअरींग, फार्मसी, एम. बी. ए., बायोटेक्नॉलॉजी व एम. सी. ए. ही महाविद्यालये वगळता) अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखडयानुसारच) विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. **सदर बृहत आराखडा हा संलग्नित महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठीही लागू राहील.**

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८२(३) नुसार दि.३१ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील.

विहीत नमून्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१,०००/- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | बृहत आरखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | सोलापूर शहर | |
| | सोलापूर शहर | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स |
| | | बॅचलर ऑफ जरनॅलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन |
| | | विधी महाविद्यालय |
| | | चित्रकला महाविद्यालय |
| | | पी. जी. नॅनो टेक्नॉलॉजी |
| २. | उत्तर सोलापूर | |
| | वडाळा | वाणिज्य महाविद्यालय |
| ३. | दक्षिण सोलापूर | |
| | वळसंग | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | बोरामणी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | होटगी / फत्ताटेवाडी / आहेरवाडी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ४. | अक्कलकोट | |
| | अक्कलकोट | कला विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | दुधनी / चपळगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मेंदर्गी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| ५. | बार्शी | |
| | बार्शी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | गौडगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मालवंडी | कला महाविद्यालय |
| | शेळगाव | बॅचलर ऑफ सोशल वर्क |
| ६. | मोहोळ | |
| | मोहोळ | विज्ञान महाविद्यालय |
| | कुरुल | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नरखेड | कला व विज्ञान महाविद्यालय |
| ७. | मंगळवेढा | |
| | मंगळवेढा / नंदेश्वर | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | बोराळे / डोणेज | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | सलगर (बु.) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ८. | सांगोला | |
| | सांगोला | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड डिजाईन |
| | महुद / वाकी शेवणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

| | | |
|---|---|---|
| ९. | माढा | |
| | माढा | विज्ञान महाविद्यालय |
| | टेंभूर्णी | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १०. | माळशिरस | |
| | माळशिरस | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नातेपुते | वाणिज्य महाविद्यालय, जर्नालिझम महाविद्यालय |
| | जाधववाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | पानीव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | तांबवे | कला महाविद्यालय |
| ११. | करमाळा | |
| | करमाळा | विज्ञान महाविद्यालय |
| | जेऊर / झरे | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | भिलारवाडी / जिंती | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १२. | पंढरपूर | |
| | पंढरपूर | संत वाडमय महाविद्यालय |
| | कोर्टी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला बृहत आराखडा शासनाकडे मान्यतेकरिता सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषदेने मान्यता दिलेली होती व तद्नंतर अधिसभेची मान्यता घ्यावी लागणार होती. तथापि अधिसभेची बैठक दि.२९/०३/२०१५ रोजी संपन्न झाली असून, दरम्यानच्या काळात अधिसभेची पुढील बैठक लवकर आयोजित होणार नसल्याने तसेच दि.३०/१०/२०१० च्या शासन निर्णयानुसार नवीन महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, विद्याशाखांचे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख दि.३१/१०/२०१५ असल्याने प्रस्ताव स्विकारण्यासाठी बृहत आराखडा अधिसभेच्या मान्यतेअंती महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठवून वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक होते. त्यास्तव विद्या परिषदेने उपरोक्तप्रमाणे तयार केलेल्या शै. वर्ष २०१६-१७ च्या बृहत आराखड्यातील बार्शी तालुक्यातील शेळगाव या ठिकाणातील बॅचरल ऑफ सोशल वर्क हा अभ्यासक्रम श्री. संजय गुळेकर, कक्ष अधिकारी, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांच्या दि.१५/०७/२०१० रोजीच्या पत्रान्वये वगळून शै. वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखड्यास अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी म. व. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये महाराष्ट्र शासनाकडे शिफारस केलेली आहे.

सबब, शै. वर्ष २०१६-१७ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता विद्या परिषदेने मान्य केलेला शै. वर्ष २०१६-१७ या एका वर्षाच्या बृहत आराखड्याची महराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यास अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये दिलेली मान्यतेची बाब माहितीस्तव).

ठराव : **शै.वर्ष २०१६-१७ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता विद्या परिषदेने मान्य केलेला शै. वर्ष २०१६-१७ या एका वर्षाच्या बृहत आराखड्याची महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यास अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये दिलेली मान्यतेची नोंद घेण्यात आली.**

[ ५ ] **डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारित बृहत आराखड्यास मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये अधिसभेच्या वतीने शासनाकडे शिफारस केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय, नवीन विषय/अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्याबाबत सर्व अधिकार मंडळाच्या मान्यतेअंती शासनाकडे शै.वर्ष २०१६-१७ चा बृहत आराखडा मान्यतेकरीता दि. १४/९/२०१५ रोजीचे पत्र क्र.सोविसो/मविविमं/ संलग्नता/५६९३ अन्वये सादर करण्यात आलेला होता.

आजअखेर कोणत्याही बृहत आराखडयास शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही त्यामुळे शै.वर्ष २०१६-१७ च्या बृहत आराखडयास शासनाची मान्यता आहे असे गृहीत धरुन शै.वर्ष २०१६-१७ चा बृहत आराखडा दि.०३/१०/२०१५ रोजीच्या दै.दिव्य मराठी, दि.०५/१०/२०१५ च्या दै.संचार व दि.०४/१०/२०१५ च्या दै.तरुण भारत मध्ये प्रसिध्द करण्यात आलेला होता. सदर बृहत आराखडयास अनुसरुन प्रस्तुत कार्यालयाकडे नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीताचे एकुण ०१ व नवीन विद्याशाखा सुरु करण्याकरीताचे ०२ प्रस्ताव या प्राप्त झालेले आहेत. तसेच बृहत आराखडा सोडून नवीन तुकडी सुरु करण्याकरीता एकुण १० प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

तथापि, दि. १७/१०/२०१५ रोजीचे पत्र क्र. उशिप २०१५/प्र.क्र.६२६/विशि-३ च्या पत्राला अनुसरुन सिध्दार्थ खरात, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०५/११/२०१५ रोजीचे पत्र क्र. उशिप १११३/प्र.क्र.६२६/विशि-३ अन्वये डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला अनुसरुन शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा तयार करुन दि. २१/११/२०१५ पर्यंत शासनाकडे सादर करावे असे कळविलेले होते. त्यामुळे डॉ.नरेंद्र जाधव यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारित बृहत आराखडा तयार करुन दि. २१/११/२०१५ पर्यंत शासनाकडे सादर करावा लागणार होते.

त्यास्तव शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा तयार करण्याबाबतचा विषय दि.१७/११/२०१५ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळासमोर सादर केले असता ठराव क्र. ०५ अन्वये शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखडा, प्राप्त निवेदने व डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अहवालास अनुसरुन शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय, विषय/अभ्यासक्रम, विद्याशाखा सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी शै.वर्ष सन २०१६-१७ या एका वर्षाचा सुधारीत शैक्षणिक बृहत आराखडा खालील प्रमाणे तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेला होता. सदर बृहत आराखडा दि. १८/११/२०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता ठराव क्र. २(९) अन्वये व्यवस्थापन परिषदेने विद्यापरिषदेस शिफारस केलेला होता. तद्नंतर सदर बृहत आराखड्यास विद्यापरिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांची म.वि.कायदा १९९४, कलम १४(७) अन्वये मान्यता घेऊन अधिसभेस शिफारस केलेली आहे.

---

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय/अभ्यासक्रम/विद्याशाखा सुरु करु इच्छिणा-या संस्थांसाठी शैक्षणिक बृहत आराखडा

**सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत सस्थांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर खालील प्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्या समोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत [बी.बी.ए, बी.सी.ए, बी.एस्स् (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी.एस.डब्लु व एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए, बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए ही महाविद्यालये वगळता] अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखडयानुसारच ) विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.** सदर बृहत आराखडा हा संलग्नित महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठीही लागू राहील.

| नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (३) नुसार दि.३१ डिसेंबर २०१५ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१,००० /- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत. | | |
|---|---|---|
| अ.क्र. | बृहत आराखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
| १. | सोलापूर शहर | |
| | सोलापूर शहर | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स |
| | | बॅचलर ऑफ जरनॅलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन |
| | | विधी महाविद्यालय |
| | | चित्रकला महाविद्यालय |
| | | पी. जी. नॅनो टेक्नॉलॉजी |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान रात्र महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| २. | उत्तर सोलापूर | |
| | वडाळा | वाणिज्य महाविद्यालय |
| ३. | दक्षिण सोलापूर | |
| | वळसंग | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | बोरामणी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | होटगी/फताटेवाडी/ आहेरवाडी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ४. | अक्कलकोट | |
| | अक्कलकोट | कला विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | दुधनी/चपळगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मैंदर्गी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| ५. | बार्शी | |
| | बार्शी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | वैराग | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | गौडगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मालवंडी | कला महाविद्यालय |
| ६. | मोहोळ | |
| | मोहोळ | विज्ञान महाविद्यालय |
| | नरखेड | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | कुरुल | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ७. | मंगळवेढा | |
| | मंगळवेढा/नंदेश्वर | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | बोराळे/डोणज | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | सलगर (बु.) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ८. | सांगोला | |
| | सांगोला/जुनोनी | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड डिझाईन |
| | महुद/वाकी शेवणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

| | | |
|---|---|---|
| ९. | माढा | |
| | माढा/कुर्डुवाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | टेंभुर्णी | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १०. | माळशिरस | |
| | माळशिरस | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नातेपुते | वाणिज्य महाविद्यालय |
| | | जर्नलिझम महाविद्यालय |
| | जाधववाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | पानीव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | तांबवे | कला महाविद्यालय |
| ११. | करमाळा | |
| | करमाळा | विज्ञान महाविद्यालय |
| | जेऊर/झरे | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | भिलारवाडी/जिंती | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १२. | पंढरपूर | |
| | पंढरपूर | संत वाडमय महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान रात्र महाविद्यालय |
| | कोर्टी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| सदरचे प्रस्ताव DVB-TT Surekh या मराठी भाषेच्या फॉन्ट मध्ये सी.डी. सह सहा (६) प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. | | |
| नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखांचे प्रस्ताव सादर करतेवेळी संस्थेने / महाविद्यालयाने नियोजित महाविद्यालय/अभ्यासक्रम/विद्याशाखा सुरु करण्याबाबत अर्जासोबत दिलेल्या नियमावली व तपासणी सूची नुसार पूर्तता करुनच प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करावा. तसेच महाविद्यालय/अभ्यासक्रम/विद्याशाखासाठी संस्थेने / महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या सोयी, सुविधा, इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या विषयीचे व्हीडीओ चित्रीकरण केलेली व्हीडीओ सी.डी. प्रस्तावाच्या प्रत्येक प्रती सोबत विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे. | | |
| उपरोक्त संदर्भातील अधिक माहितीसाठी संलग्नता विभाग, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर येथे व्यक्तिश: किंवा दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७४४७७१ /७२ (विस्तार क्र. १२२) येथे संपर्क साधावा. | | |
| टिप- १. | अपूर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत | |
| २. | शै. वर्ष २०१६-१७ साठी मान्यता प्राप्त संस्था/ संलग्नित महाविद्यालयांकडून बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए., बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. | |
| ३. | नॅक मुल्यांकन /पुनर्मुल्यांकन झालेल्या 'अ' मानांकन प्राप्त महाविद्यालयाना प्राधान्य असेल. | |
| ४. | नामवंत औद्योगिक संस्थांना सामाजिक बांधीलकी म्हणून नवीन उच्च दर्जाची महाविद्यालये/अभ्यासक्रम सुरु करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. | |
| ५. | सदरचे जाहिर निविदन (बृहत आराखडा) htpp://su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावर News/Events व Download या मथळ्याखाली उपलब्ध आहे. | |
| ६. | बृहत आराखडा संदर्भात शासनाकडून वेळोवेळी विहीत केली जाणारी मार्गदर्शक तत्वे /सूचना /आदेश लागू राहतील. | |

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला बृहत आराखडा शासनाकडे मान्यतेकरीता सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभेच्या मान्यतेअंती महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेकरीता सादर करावे लागणार होते. सदर बाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ८२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

बृहत आराखड्याबाबत म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (१) मधील तरतूद:- The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unserved and under -developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा शासनाकडे मंजूरीकरीता सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व तद्नंतर अधिसभेची मान्यता घ्यावी लागणार असून सदर बृहत आराखड्यास दि.१८/११/२०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र. २(९) अन्वये विद्यापरिषदेला शिफारस केलेली होती व विद्यापरिषदेच्या वतीने म.वि.कायदा १९९४, कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयानी अधिसभेला शिफारस केलेली होती. तथापि अधिसभेची बैठक दि. २८/११/२०१५ रोजी आयोजित केलेली होती. तसेच, सिध्दार्थ खरात, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०५/११/२०१५ रोजीचे पत्र क्र. उशिप १११३/प्र.क्र.६२६/विशि-३ अन्वये डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला अनुसरुन शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा तयार करुन दि. २१/११/२०१५ पर्यंत शासनाकडे सादर करावे असे कळविलेले असल्यामुळे शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा तयार करुन दि. २१/११/२०१५ पर्यंत शासनाकडे सादर करणे बंधनकारक असल्यामुळे उपरोक्त शै. वर्ष २०१६-१७ चा सुधारीत बृहत आराखडा म.वि. कायदा १९९४ कलम ८२(१) अनुसरुन अधिसभेच्यावतीने मा. कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये महाराष्ट्र शासनाकडे शिफारस केलेली आहे.

सबब, डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला अनुसरुन उपरोक्त प्रमाणे तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ च्या सुधारीत बृहत आराखड्यास मा. कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) ा अन्वये अधिसभेच्यावतीने शासनाकडे शिफारस केल्याची बाब माहितीस्तव.

ठराव: डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ चा सुधारित बृहत आराखड्यास मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये अधिसभेच्या वतीने शासनाकडे शिफारस केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
कुलसचिव
सचिव, अधिसभा

सही/-
मा. कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा